INTERNATIONAL BACCALAUREATE
BACCALAURÉAT INTERNATIONAL
BACHILLERATO INTERNACIONAL

M00/181/S

**MARATHI A1 – STANDARD LEVEL – PAPER 1**
**MARATHI A1 – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1**
**MARATHI A1 – NIVEL MEDIO – PRUEBA 1**

Monday 8 May 2000 (morning)
Lundi 8 mai 2000 (matin)
Lunes 8 de mayo del 2000 (mañana)

3 hours / 3 heures / 3 horas

---

INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Section A: Write a commentary on one passage. Include in your commentary answers to all the questions set.
- Section B: Answer one essay question. Refer mainly to works studied in Part 3 (Groups of Works); references to other works are permissible but must not form the main body of your answer.

INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- Ne pas ouvrir cette épreuve avant d'y être autorisé.
- Section A : Écrire un commentaire sur un passage. Votre commentaire doit traiter toutes les questions posées.
- Section B : Traiter un sujet de composition. Se référer principalement aux œuvres étudiées dans la troisième partie (Groupes d'œuvres) ; les références à d'autres œuvres sont permises mais ne doivent pas constituer l'essentiel de la réponse.

INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Sección A: Escriba un comentario sobre uno de los fragmentos. Debe incluir en su comentario respuestas a todas las preguntas de orientación.
- Sección B: Elija un tema de redacción. Su respuesta debe centrarse principalmente en las obras estudiadas para la Parte 3 (Grupos de obras); se permiten referencias a otras obras siempre que no formen la parte principal de la respuesta.

## विभाग ''अ''

**पुढे दोन उतारे दिलेले आहेत. त्यापैकी एका उताऱ्याचे रसग्रहण करा.**

१ (अ)

''तू असं कर. एक सुंदर गोष्ट माझ्यासाठी लिहून ठेव.'' ही आज्ञा ऐकल्यावर त्या यंत्रमानवाला काय करावं हेच सुचेना. बरं मालकानं दिलेली आज्ञा तर ऐकायलाच हवी होती. त्याशिवाय पर्यायच नव्हता. आता काय करायचं? बरं, ही आज्ञा जेव्हा मालकांनी दिली तेव्हा ते घराबाहेर पडत होते. त्यामुळे त्यांना अधिक काही विचारणंही शक्य नव्हतं. त्यांच्यासाठी चांगली गोष्ट लिहायची म्हणजे नक्की काय करायचं? त्यांच्या आवडत्या वस्तूचं नाव लिहायचं? त्यांच्या आवडत्या खाद्य पदार्थाचं नाव लिहायचं? या दोन्ही प्रश्नांची उत्तरं, नाही अशीच होती हे त्याला ठाऊक होतं. कसं? त्यानंच एकदा मालकांना विचारलं होतं, 'मालक, तुम्ही गोष्ट लिहिता म्हणजे नक्की काय करता?' आपले मालक उपजीविकेसाठी गोष्टी लिहितात, त्यांना लोक लेखक म्हणतात, हे तो ऐकत होता.

''काय, लेखक महोदय आहेत का घरी?'' हा प्रश्न त्याला अनेकांनी विचारला होता. त्यातूनच लेखक म्हणजे काय हा प्रश्न निर्माण झाला होता. त्याच्या मालकांनी त्याला आपण लेखन करतो म्हणजे काय करतो, डोक्यात कल्पना कशा निर्माण होतात वगैरे सांगितलं होतं. कल्पनाशक्ती किंवा असंच काहीसं ते म्हणाले होते. आता कल्पनाशक्ती म्हणजे काय? हे मात्र त्याला कळलेलं नव्हतं. म्हणजे ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत त्या... हे काही तरी त्याच्या दृष्टीनं अनाकलनीय होतं. प्रत्येक गोष्ट तर्कसंगत असते असं त्याचा मेंदू त्याला सांगत होता. प्रत्येक घटनेला कार्यकारणभाव असतो, हे तर त्याच्या संगणकी मेंदूत ठासून भरविण्यात आलं होतं. अशा परिस्थितीत, चांगली गोष्ट कशी लिहायची हे त्याला कळत नव्हतं.

त्यानं त्याच्या मालकांनी लिहिलेल्या अनेक गोष्टी वाचल्या होत्या. 'नेमका त्याच वेळी योगायोगानं उमेश तिथं हजर झाला. योगेशला मात्र त्याचे आश्चर्य वाटले नव्हते, असे काही तरी घडेल याची त्याला अपेक्षाच होती. योगेशचं नशीब असं विचित्र की दर वेळेस त्याने एखादी गोष्ट करायला घेतली की तिथं उमेश तडमडणारच, याची त्याला अनुभवानं खात्री पटत चालली होती.' असं त्याच्या मालकांनी एका गोष्टीत लिहिलं होतं. त्या वेळी त्या गोष्टीतल्या बऱ्याच शब्दांचा अर्थ त्यानं मालकांना विचारला होता. उदाहरणार्थ योगायोग म्हणजे काय? योगेशला का आश्चर्य वाटले नाही. नशीब म्हणजे काय? विचित्र नशीब कसं असतं? त्या वेळेस मालक म्हणाले होते ''तुला ते कळणार नाही. मला त्रास देऊ नकोस.'' नंतर एकदा अशाच कुठल्या तरी शब्दाचा अर्थ त्यानं मालकांना विचारला होता. त्या शब्दाचा अर्थ सांगताना मालक म्हणाले, ''अरे हा शब्दशः अर्थ झाला, पण वापरून वापरून शब्दांना वेगळे संदर्भ प्राप्त होतात. त्यामुळे शब्दाचा अर्थ कळून उपयोग नाही, त्याचा आत्मा कळायला हवा.''

ही आत्मा नावाची एक वेगळीच चीज होती. म्हणजे काय? हा प्रश्न मालकांनी उडवून लावला होता. ते तुला नाही कळणार, असं ते म्हणाले होते. का नाही कळणार? या प्रश्नावर त्यांनी नुसतच स्मित केलं होतं. या माणसांशी कसं वागावं हेच त्या यंत्रमानवाला कळत नव्हतं. याचं कारण या मंडळींना तर्कशुद्ध विचारसरणी एक तर जमत नव्हती किंवा ते मुद्दाम अतार्किक वागत होते. तेव्हा या मानवांना तर्कशुद्ध विचारसरणी जमत नव्हती असं म्हणणंच तर्कशुद्ध ठरत होतं.

**– निरंजन घाटे ''कथा एका कथेची'', 'यंत्रलेखक', मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९६**

- उताऱ्याच्या प्रारंभापासून स्थापित होत जाणारे मानव व यंत्रमानव यांच्यातील परस्परसंबंध कसे आहेत?

- या दोघांच्या अनुभवविश्वांबद्दल लेखक काय सूचित करतो आहे?

- भाषा, साहित्य इ. क्षेत्रातील मानवी व्यवहारांबद्दल लेखकाला येथे काय सुचवायचे आहे? कशा पद्धतीने ते साध्य केले आहे?

- या उताऱ्याच्या रचनेचे कोणते विशेष जाणवतात?

१ (ब)

हिमलाट पहाटे पहा जगावर आली !
मुखि पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणी ओस
उद्दाम धावते करित दुभङ्ग धरेस
करकरा पाखरे रगडी दाताखाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !
श्रीमन्त महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !
पाहून परन्तू कुठे कुडाची खोपी
कंगाल कांबळी टाकुन गेले झोपी
शेकडो कवाडे ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथे लाव भुकेली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !
ज्योतीतुनि धावत या तेजःकण सारे
या यज्ञातिल अन् सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

**– कुसुमाग्रज, 'तेजाची लेणी', संपा. पी. एस्. पवार पृ. ६३**

- या कवितेतील शब्दयोजनेविषयी काय म्हणता येईल?

- या कवितेतील प्रतिमांचे उपयोजन कशा स्वरूपाचे आहे?

- या कवितेतून व्यक्त होणारा दृष्टिकोन कसा आहे, असे वाटते?

- ही कविता वाचून मनात कोणती प्रतिक्रिया उमटते?

## विभाग 'ब'

**पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. तुमचे उत्तर तुम्ही अभ्यासलेल्या अभ्यासक्रमाच्या भाग ३ मधील किमान दोन पुस्तकांवर आधारलेले असावे. इतर साहित्यकृतींचे संदर्भ देण्यास हरकत नसली, तरी तो तुमच्या उत्तराचा मुख्य भाग नसावा.**

२. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यकृतींमध्ये भूतकाळाविषयीचे आकर्षण (नॉस्टाल्जिया) **किंवा** भविष्याविषयीचे स्वप्नरंजन यांचे स्थान काय आहे, ते स्पष्ट करा.

३. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यकृतींमध्ये नकारात्मक ('खल' प्रवृत्तीच्या) व्यक्तिरेखांनी बजावलेल्या भूमिकांचे तौलनिक विवेचन करा. त्यांचे स्थान कितपत महत्त्वाचे आहे व त्यांच्या अस्तित्वामुळे कथानकाचा विकास **किंवा** लेखकाच्या मनातील कल्पनांचा आविष्कार घडून येण्यास कितपत मदत झाली आहे?

४. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यकृतींमध्ये 'संघर्ष' या तत्त्वाचा आविष्कार कसा दिसून येतो? याचे विवेचन करा.

५. काही लेखक आपणाकडे 'शिक्षकांची भूमिका घेऊन आपल्या साहित्यकृतीतूनही 'धडे' देतात. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यकृतींकडे 'धडे' म्हणून कशा प्रकारे पाहता येईल?

६. तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींमधील वातावरणनिर्मितीबद्दल तौलनिक विवेचन करा.